निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : २७० वा.
गुरूवार :०४ डिसेंबर २०२५

मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे | E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247

## ऑरेंज गेट बोगदा प्रकल्पाचा प्रारंभ; मुंबईच्या वाहतुकीस मोठा दिलासा मिळणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** पूर्व मुक्त मार्गामुळे नागरिकांना पूर्व उपनगरा-तून दक्षिण मुंबईत २०-२५ मिनिटांत पोहोचता येते; मात्र पुढील प्रवासासाठी अर्धा ते पाऊण तास वाहतूक कोंडीत अडकावे लागत होते. तसेच पश्चिम उप-नगर आणि दक्षिण मुंबईतील नागरिकांना नवी मुंबई विमानतळाकडे जाण्यासाठी लांबचा मार्ग घ्यावा लागत होता. या समस्येवर तोडगा म्हणून ऑरेंज गेट बो-गद्याची संकल्पना मडण्यात आली, या प्रकल्पामुळे मुंबईच्या वाहतुकीस मोठा दिलासा मिळणार आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचा प्रवास अधिक सुलभ करण्यासाठी महत्त्वाकांक्षी ऑरेंज गेट ते मरीन ड्राईव्ह शहरी बो-गदा प्रकल्पाचा मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. या प्रसंगी टनेल बोरिंग मशीन (टीबीएम) चे लोकार्पण करण्यात आले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार अमीन पटेल, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या आयुक्त रुबल अग्रवाल आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, पूर्वी या ठिकाणी फ्लायओव्हर उभारण्याचा विचार होता; परंतु, जागेअभावी आणि प्रचंड वाहतुकीमुळे ते शक्य नाही. हा परिसर मोहम्मद अली रोड फ्लायओव्हरपेक्षाही अधिक दाटीचा असल्याने बोगदा हा एकमेव व्यावहारिक आणि सुरक्षित पर्याय आहे. हा बोगदा जवळपास ७०० प्रॉपर्टीजच्या खालून, शंभर वर्षे जुन्या हेरिटेज इमारती, तसेच पश्चिम आणि मध्य रेल्वे लाईन्सखालून जाणार आहे.

विशेष म्हणजे, हा बोगदा मेट्रो-३ च्या ५० मीटर खाली खोदला जाणार आहे. त्यामुळे हा प्रकल्प एका अर्थाने 'इंजिनिअरिंग मार्व्हल' ठरणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

या प्रकल्पाचे काम डिसेंबर २०२८ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असून, ते आणखी सहा महिने आधी पूर्ण करण्याचा प्रयत्न आहे. एल अँण्ड टी या नामांकित कंपनीकडे कामाची जबाबदारी सोपवण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले.

वरळी-शिवडी सी-लिंक पुढील वर्षी खुला झाल्यानंतर, तसेच कोस्टल रोड जोडणी झाल्यावर, पश्चिम उप-नगरातील लोकांनाही नवी मुंबई विमानतळाकडे जाण्यासाठी दोन पर्याय उपलब्ध होतील.

त्यामुळे हजारो लोकांचे हजारो तास वाचवणारा हा प्रकल्प असून, मुंबईच्या वाहतुकीसाठी आजचा दिवस ऐतिहासिक आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

प्रकल्पाची माहिती

मुंबई महानगर क्षेत्रातील वाढती वाहतूक मागणी आणि वाहतुकीच्या परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी, मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) ऑरेंज गेट ते मरीन ड्राइव्ह या मुंबई शहरा-तील भूमिगत रस्त्याचे बांधकाम हाती घेतले आहे.प्रकल्पाचा खर्चः रु ८०५६ कोटी ,पूर्णत्वाचा कालावधीः ५४ महिने,प्रकल्पाचे मुख्य फायदे मुंबईतील पूर्व-पश्चिम उपनगरे आणि नवी मुंबई या



भुयारी मार्गाद्वारे जोडली जाईल.

प्रवासाचा वेळ १५-२० मिनिटांनी कमी होईल.इंधनाची बचत होईल.तसेच ध्वनी आणि वायू प्रदूषण कमी होण्यास मदत होईल.

प्रकल्प तपशील-हा भारतातील पहिला शहरी बोगदा प्रकल्प असून तो घनदाट लोकवस्ती असलेल्या भागाखा-लून तसेच मध्य, पश्चिम रेल्वे आणि मुंबई मेट्रो लाईन ३ (अॅक्वा लाईन) च्या ५० मी. खालून जातो.

प्रकल्पाची एकूण लांबी ९.९६ किमी , ज्यामध्ये जवळपास ७ किमी भुयारी मार्ग .प्रत्येक बोगद्यात ३.२ मीटर रुंदीचे २ पदरी रस्ते, १ पदरी आपत्कालीन रस्ता . दोन्ही बोगद्यांमध्ये वेग मर्यादा वेग ८० किमी/तास .

दोन्ही बोगदे सुरक्षिततेच्या दृष्टीने एकमेकांशी प्रत्येकी ३०० मी. अंतरावर क्रॉसपॅसेजद्वारे जोडले जातील.बोगद्यांमध्ये हवा खेळती राहण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या क्षमतेचे यांत्रिकीकरण करण्याचे प्रस्तावित आहे. आग प्रतिरोधक यंत्रणा, पुरेशा प्रमाणात प्रकाश व्यवस्था, सुयोग्य व आधुनिक पद्धती-ने वाहतूक विनिमयासाठी इन्टेलिजंट ट्रान्सपोर्ट सिस्टम (आयटीएस) इत्यादी बाबींचे प्रयोजन आहे.प्रकल्पाच्या जमिनीखालील सरेखनामुळे भू-संपादन कमी होते, शहरी वातावरण जपते आणि शहरात कमीत कमी व्यत्यय सुनिश्चित करते.

सदर प्रकल्प हा मुंबई किनारी रस्ता प्रकल्प आणि अटल सेतू सारख्या प्रमुख पायाभूत सुविधा प्रकल्पांशी जोडला जातो.

बोगद्यासाठी वापरण्यात येण-ारे तंत्रज्ञान या प्रकल्पासाठी वापरण्यात येणारी यंत्रणा स्लरी शील्ड प्रकारची टनेल बोरिंग मशीन असून, ही उच्च तंत्रज्ञानावर आधारित आणि मुंबईच्या किनारी भूगर्भातील मिश्र व खडकाळ भूस्तराकरीता अचूक व सुरक्षित खोदकाम करणारी यंत्रणा आहे.

हे तंत्रज्ञान मुंबई कोस्टल रोड प्रकल्पात देखील वापरण्यात आले असल्याने कार्यक्षम असल्याचे सिद्ध झाले आहे.टनेल बोरिंग मशीन (टीबीएम)

प्रकल्पासाठी वापरले जाणाऱ्या टीबीएमचे नूतनीकरण आणि पुनर्निर्मितीची कामे स्थानिक पातळी-वर मूळ टनेल बोरिंग मशीन उत्पादक (ओईएम) यांचा देखरेखीत करण्यात आले आहे.कटर हेड व्यासः १२.१९ मीटर,

लांबी: ८२ मीटर,वजनः अंदाजे २,४०० मेट्रिक टन.

## संक्षिप्त

### राज्य विधिमंडळाचे नागपूर हिवाळी अधिवेशन ८ ते १४ डिसेंबर दरम्यान

विधानसभा आणि विधानपरिषद विधिमंडळ कामकाज सल्लागार समिती बैठकीत निर्णय



**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** महाराष्ट्र विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन सोमवार ८ ते रविवार १४ डिसेंबर २०२५ या कालावधीत नागपूरमध्ये होणार आहे. १३ डिसेंबर शनिवार आणि १४ डिसेंबर रविवार शासकीय सुट्टीच्या दिवशीही दोन्ही सभागृहाचे कामकाज घेण्याचा निर्णय विधिमंडळ कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत घेण्यात आला.

विधानभवन येथे विधिमंडळ कामकाज सल्लागार समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीला विधान परिषद सभापती प्रा.राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधानपरिषद उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, उच्च व तंत्र शिक्षण, संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत (दादा) पाटील, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, सांस्कृतिक कार्य मंत्री ड. आशिष शेलार, विधानसभा सदस्य सर्वश्री सुधीर मुनगंटीवार, दीपक केसरकर, जितेंद्र आव्हाड, भास्कर जाधव, सुनील प्रभू, अमीन पटेल विधानपरिषद सदस्य अनिल परब, प्रसाद लाड, प्रवीण दरेकर, विक्रम काळे, सतेज पाटील, विधिमंडळाचे सचिव जितेंद्र भोळे आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते.

भारताच्या संविधानाची गौरवशाली अमृत महोत्सवी वाटचाल या ऐतिहासिक पर्वानिमित्त २६ मार्च २०२५ रोजी विधानसभेत चर्चा झाली होती. या वेळी झालेल्या चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या भाषणाचे पुस्तक स्वरूपातील संकलन महाराष्ट्र विधिमंडळ वि.स. पांगे संसदीय प्रशिक्षण केंद्राच्या पुढाकारातून करण्यात आले आहे. या पुस्तकाचे प्रकाशन मंगळवार, ९ डिसेंबर २०२५ रोजी राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या हस्ते करण्यात येणार आहे, असे विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर यांनी यावेळी सांगितले.




## औरंगाबाद विभाग पदवीधर मतदार संघप्रारुप मतदार यादी प्रसिद्ध

**विभागात एकूण २ लाख ४० हजार ५४९ मतदार**

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार, दिनांक ०१ नोव्हेंबर २०२५ या अर्हता दिनांकावर आध-ारीत पदवीधर मतदारसंघासाठी नव्याने मतदार याद्या तयार करण्याचा कार्यक्रम घोषित केला आहे. सदर सुधारीत कार्यक्रमानुसार मतदारयादीच्या प्रारूप प्रसिध्दीचा दिनांक ०३ डिसेंबर, २०२५ (बुधवार) होता. त्यानुसार प्रारुप मतदार यादी आज प्रसिध्द करण्यात आली.

विभागीय आयुक्त कार्यालयात या कार्यक्रमावेळी विभागीय आयुक्त तथा ०५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदार संघ मतदार नोंदणी अधिकारी जितेंद्र पापळकर, अपर आयुक्त सामान्य प्रशासन तथा सहायक मतदार नांदणी अधिकारी श्रीमती मंजुषा मिसकर यांच्यासह तसेच राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात एकूण ४६ हजार ४०६ पुरूष, १५ हजार ९०८ महिला व ४ तृतीयपंथी असे एकूण ६२ हजार ३१८ मतदार आ-हेत. जालना जिल्ह्यात एकूण २३ हजार ६४८ पुरूष, ५ हजार २७२ महिला तर २ तृतीयपंथी असे एकूण २८ हजार ९२२ मतदार आहेत. परभणी जिल्ह्यात १६ हजार ६३५ पुरूष, ४ हजार ६४ महिला तर १ तृतीयपंथी असे एकूण २० हजार ७०० मतदार आहेत. हिंगोली जिल्ह्यात ६ हजार ४७६ पुरूष, १ हजार ५२८ महिला असे एकूण ६ हजार ४ मतदार आहेत. नांदेड जिल्ह्यात २३ हजार ८६७ पुरूष, ६ हजार २६४ महिला तर ४ तृतीयपंथी असे एकूण ३० हजार १३५ मतदार आहेत. लातूर जिल्ह्यात १७ हजार ४९२ पुरूष, ४ हजार ९९३ महिला तर २ तृतीयपंथी असे एकूण २२ हजार ४८७ मतदार आहे. धाराशिव जिल्ह्यात १६ हजार ७६२ पुरूष, ४ हजार ४७ महिला असे एकूण २० हजार ८०९ मतदार आहेत. बीड जिल्ह्यात ३४ हजार ४८५ पुरूष, ९ हजार ६८७ महिला तर २ तृतीयपंथी असे एकूण ४७ हजार १७४ मतदार आहेत. विभागातील आठही जिल्ह्यात एकूण १ लाख ८८ हजार ७७१ पुरूष, ५१ हजार ७६३ महिला तर १५ तृतीयपंथी असे एकूण २ लाख ४० हजार ५४९ मतदार आहेत.

पुढील अत्यंत महत्वाचा टप्पा, म्हणजेच दावे व हरकती स्वीकारण्याचा कालावधी (कलम १२ अन्वये) (झशीळेव षीं षळश्रळपस`ष लश्ररळाी रपव `लक्षशलींळेपी), हा दिनांक ०३ डिसेंबर २०२५ (बुधवार) ते १८ डिसेंबर २०२५ (गुरुवार) असा निश्चित करण्यात आला आहे. या कालावधीमध्ये प्राप्त झालेल्या सर्व दावे व हरकती दिनांक ०५ जानेवारी, २०२६ पुर्वी निकाली काढण्यात येणार आहेत. अंतिम मतदार यादी प्रसिद्धी दिनांक १२ जानेवारी, २०२६ (सोमवार) असा निश्चित करण्यात आला असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.

## १२ नक्षलवाद्यांचा खात्मा

आत्ताच एक्सप्रेस

नागपूर /प्रतिनिधी/ देशा-चे गृहमंत्री अमित शाह यांनी एकीकडे नक्षलमुक्त भारत अभियान सुरू केले असून महाराष्ट्राच्या गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्यातील नक्षलवाद्यांचे समर्पण करुन घेण्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना यश आले आहे. गेल्याच महिन्यात त्यांच्या उपस्थितीत नक्षलवाद्यांचा कमांडो आणि मोठं बक्षीस असलेल्या नेत्याने संविधान हाती घेत नक्षल चळवळीला रामराम ठोकला. देवेंद्र फडणवीस यांनीही नक्षलमुक्त महाराष्ट्राच्या दृष्टीने पाऊल टाकलं आहे. मात्र, अद्यापही छत्तीसगडमध्ये नक्षलवादी, माओवाद्यांच्या कारवाया सुरूच असल्याचं दिसन येतं. आज सकाळपासूनच छत्तीसडच्या बिजापूर आणि दंतेवाडा जिल्ह्यात झालेल्या चकमकीत १२ नक्षलवाद्यांना कंठस्नान घालण्यात आलं असून ३ जवानही शहीद झाल्याची घटना घडली आहे.

छत्तीसगडमध्ये सुरक्षा दल आणि नक्षलवाद्यांमध्ये भीषण चकमक सुरू असून १२ नक्षलवाद्यांना ठार करण्यात सुरक्षा दलाच्या जवानांना यश आले आहे. मात्र, या चकमकीत सुरक्षा दलांचे ३ जवान शहीद झाले आहेत. छत्तीसगडमधील बिजापूर आणि दंतेवाडा जिल्ह्यांच्या सीमारेषेवर पश्चिम बस्तर डिव्हिजन क्षेत्रात छत्तीसगड पोलिसांचे डीआरजी पथक आणि नक्षलवाद्यांमध्ये भीषण चकमक सुरू आहे. सायंकाळपर्यंत मिळालेल्या माहितीप्रमाणे १२ नक्षलवाद्यांचा खात्मा करण्यात सुरक्षा दलाच्या जवानांना यश आले आहे.

## राष्ट्रपतींच्या हस्ते 'राष्ट्रीय दिव्यांगजन सशक्तीकरण पुरस्कार- २०२५' प्रदान

**महाराष्ट्रातील प्रतिभांचा विज्ञान भवनात सन्मान**

**आत्ताच एक्सप्रेस**

**नवी दिल्ली /प्रतिनिधी/** महाराष्ट्रातील दिव्यांगजनांच्या कल्याणासाठी कार्यरत संस्था आणि उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या दिव्यांग व्यक्ती यांना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते 'राष्ट्रीय दिव्यांगजन सशक्तीकरण पुरस्कार-२०२५' प्रदान करण्यात आले.आंतरराष्ट्रीय दिव्यांगजन दिनाचे औचित्य साधून नवी दिल्ली येथील विज्ञान भवन येथे आयोजित या सोहळ्यास केंद्रीय सामाजिक न्याय आणि अधिकारिता मंत्री डॉ. वीरेंद्र कुमार आणि दिव्यांगजन सशक्तीकरण विभागाच्या सचिव बी. विद्यावती यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

राष्ट्रीय सन्मानाने महाराष्ट्रातील कर्तृत्वाचा गौरव

नागपूरच्या अबोली विजय जितना यांना सर्वोत्कृष्ट दिव्यांगजन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. जितना या नागपूरच्या पहिल्या व्हीलचेअर मॉडेल आणि प्रेरक वक्ता म्हणून ओळखल्या जातात. तर, पुण्यातील भाग्यश्री मनोहर नादी मित्तला कन्ना यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्या श्रवण बाधित असूनही कला आणि व्यावसायिक कौशल्य शिक्षिका म्हणून त्यांनी ५०० हून अधिक विद्यार्थ्यांना प्रशिक्षित केले आणि आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिकमध्ये देशा-चे प्रतिनिधित्व केले आहे. तसेच, कुमारी धृती रांका (पुणे) हिला श्रेष्ठ दिव्यांग बाल-बालिका श्रेणीत सन्मान मिळाला. धृती 'टिकलर आर्ट'ची संस्थापक असून न्यूरो-डायव्हर्स कलाकारांच्या आजीविकेला प्रोत्स-ाहन देते आणि तिने शार्क टँक इंडियासह अनेक आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर भारताचे प्रतिनिधित्व केले आहे.

याव्यतिरिक्त प्रसिद्ध ऑडिओलॉजिस्ट आणि समाजसेविका देवांगी पराग दलाल (विलेपार्ले, मुंबई) यांनाही पुरस्कृत करण्यात आले. त्यांनी जोश फाउंडेशनच्या माध्यमातून २००० हून अधिक मुलांना मोफत श्रवण यंत्रे आणि थेरपी प्रदान केली आहे. संस्था श्रेणीत जय वकील फाउंडेशन अँड रिसर्च सेंटर (मुंबई) या संस्थेला बौद्धिक आणि विकासात्मक दिव्यांगता असलेल्या व्यक्तींच्या सशक्तीकरणासाठी सर्वो त्कृष्ट संस्था म्हणून गौरविण्यात आले. तसेच, डिजिटल सुगमता क्षेत्रात महत्त्वाचे कार्य करणाऱ्या बॅरियर ब्रेक सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड (मुंबई) ला सर्वोत्कृष्ट सुगम्य माहिती तंत्रज्ञान श्रेणीतील पुरस्कार मिळाला आहे.

दिव्यांगजन समानतेचे भागीदार: राष्ट्रपती

पुरस्कार विजेत्यांचे अभिनंदन करताना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू म्हणाल्या, दिव्यांगजन हे समानतेचे हक्कदार आहेत. समाज आणि देशाच्या विकासप्रक्रियेत त्यांची समान भागीदारी निश्चित करणे हे सर्वांचे कर्तव्य आहे. दिव्यांगजनांच्या समान सहभागानेच कोणताही समाज खऱ्या अर्थाने विकसित समाज ओळ-खला जातो असेही त्यांनी यावेळी सांगितले. केंद्र सरकारने आता कल्याणकारी दृष्टिकोन सोडून 'अधिकार-आधारित, सन्मान-केंद्रित व्यवस्था' स्वीकारली आहे. २०१५ पासून 'दिव्यांगजन' या शब्दाचा वापर करण्याचा निर्णय त्यांच्याप्रति विशेष आदर दर्शवतो. सुगम्य भारत अभियान, २०१६ चा दिव्यांगजन अधिकार कायदा आणि राष्ट्रीय शिक्षा नीती २०२० च्या प्रभावी अंमलबजावणीतून दिव्यांगजनांना सशक्त केले जात आहे. यावेळी त्यांनी विशेषत: श्रेष्ठ दिव्यांग बालक मास्टर मोहम्मद यासिन (केरळ) आणि श्रेष्ठ दिव्यांग बालिका कुमारी धृती रांका (पुणे, महाराष्ट्र) यांच्यासह पुरस्कारप्राप्त सर्व मुलींच्या अस-ाधारण कामगिरीचे कौतुक केले.



कार्यक्रमाच्या सुरुवातीला कुमारी वैष्णवी थापा या दृष्टिहीन विद्यार्थिनीने सरस्वती वंदना सादर केली.

# भारतीय नौदल दिन

**आज भारतीय नौदल दिन. भारतीय नौदलातर्फे दरवर्षी ४ डिसेंबर हा दिवस भारतीय नौदल दिन म्हणून साजरा केला जातो. त्याआधीचा पूर्ण सप्ताह हा देशभरात नौदल सप्ताह म्हणून साजरा केला जातो. ४ डिसेंबर याच दिवशी नौदलदिन का साजरा केला जातो हे जाणून घेऊया. १९७१ सालच्या सुरवातीपासूनच भारत आणि पाकिस्तानमध्ये कमालीचा तणाव निर्माण झाला होता. तत्कालीन पूर्व पाकिस्तान मधून पाकिस्तानी हवाईदल सातत्याने भारतीय हद्दीत घुसखोरी करत होते. भारताने अनेकदा इशारे देऊनही पाकिस्तान आपली खोड मोडायला तयार नव्हते. १९७१ च्या एप्रिल महिन्याच्या सुमारासच युद्ध पुकारण्यासदृश परिस्थिती निर्माण झाली होती. पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी या पार्श्वभूमीवर सैन्य दलांच्या अधिकाऱ्यांची बैठक बोलावली या बैठकीला मंत्रिमंडळातील सर्व सदस्य उपस्थित होते. लष्करप्रमुख सॅम माणेकशॉ यांनी या बैठकीत स्पष्ट सांगितले की सध्याची परिस्थिती आणि ऋतू हे आपल्यासाठी अनुकूल नसल्याने सध्यस्थितीत युद्ध आपल्याला परवडणारे नाही. युद्धासाठी नोव्हेंबर पर्यंत थांबावे लागेल. नोव्हेंबर पर्यंत सैन्याची जुळवाजुळव व्यवस्थित करता येईल याची खात्री देण्यासही ते विसरले नाही. खरंतर एप्रिलमध्येच युद्ध व्हावे या मताच्या इंदिरा गांधी होत्या पण लष्करप्रमुखांनी परिस्थिती विषद केल्यानंतर नोव्हेंबर पर्यंत थांबण्याचा निर्णय पंतप्रधान आणि मंत्रिमंडळाने घेतला. त्यामुळे आपण काहीही केले तरी भारत आपल्याला उलट उत्तर देऊ शकणार नाही अशा आविर्भावात पाकिस्तान वावरू लागला. त्यांनी ३ डिसेंबर रोजी भारतीय सीमाभागावर पूर्व आणि पश्चिम पाकिस्तानातून जोरदार हल्ले चढवले. त्याचवेळी भारतीय विमानवाहक युद्धनौका आयएनएस विक्रांतला सागरतळात बुडवण्याची योजना पाकिस्तानने आखली. पाकिस्तानची ही योजना भारतीय नौदलाच्या लक्षात आल्याने भारतीय नौदलाने चुकीचा संदेश पाठवून पीएनएस गाझीची दिशाभूल केली आणि डाव साधला. भारतीय नौदलाने चढवलेल्या हल्ल्यात गाझी या पाकिस्तानच्या पाणबुडीला जलसमाधी मिळाली. भारताच्या आयएनएस विक्रांतला सागर तळाशी पाठवण्याची स्वप्ने पाहणाऱ्या पाकिस्तानी नौदलाची सर्वात शक्तिशाली असलेली गाझी ही पाणबुडीच सागर तळाशी पोहचल्याने पाकिस्तानला मोठा धक्का बसला. गाझी पाणबुडीला जलसमाधी मिळाल्यानंतर बंगालच्या उपसागरात आयएनएस विक्रांतने आपला दरारा पसरवला आणि पाकिस्तानी नौदलाचे कंबरडे मोडून काढले. आयएनएस विक्रांतवरील धावपट्टीचा वापर करत नौदलाच्या लढाऊ विमानांनी हल्ला चढवून पूर्वेकडे पाकिस्तानला डोकेही वर काढू दिले नाही. हे सुरू असतानाच पश्चिमी मुख्यालयाच्या नौदल ताफ्याने धाडसी नियोजन करुन लहान आकाराच्या नौकांच्या मदतीने छुप्या पद्धतीने पाकिस्तानी सागरी हद्दीत प्रवेश करत थेट कराची बंदरावरच हल्ला चढवला. पाकिस्तानी युद्धनौका, पाणबुड्या त्यांच्यावरील या अचानक झालेल्या हल्ल्याने हादरुन गेल्या. कराची बंदरावर थेट हल्ला होऊ शकतो, याची कल्पनाच पाकिस्तानी नौदलाने केली नव्हती. ३ व ४ डिसेंबरच्या मध्यरात्री भारतीय नौदलाने केलेल्या या हल्ल्याने पाकिस्तानचे कंबरडे मोडले आणि युद्धाचे पारडे भारताच्या बाजूने झुकले.**

**त्यानंतर दहा दिवसांतच पाकिस्तानने शरणागती पत्करली. नौदलाच्या या पराक्रमाची आठवण म्हणून ४ डिसेंबर हा दिवस नौदल दिन म्हणून साजरा केला जातो. त्यानंतर भारतीय नौदलाचा जगभरात दबदबा निर्माण झाला. अरबी समुद्र, बंगालचा उपसागर आणि दक्षिण महासागरात भारतीय नौदलाचे सामर्थ्य निर्माण झाले. आज भारतीय नौदल हे जगातील सर्वाधिक शक्तिशाली नौदल म्हणून ओळखले जाते. आज भारताचे नौदल हे जगातील पाचव्या क्रमांकाचे नौदल आहे. भारतीय नौदलाकडे एकूण ५५ युद्धनौका आणि ५८ हजार ३५० सैनिक आहेत. भारताकडे ९ विध्वंसक, १५ नौका, न्यूक्लिअर हल्ला करणारी एक पाणबुडी, १४ पारंपरिक पाणबुडीसह आधुनिक शस्त्रे आहेत म्हणूनच जगातील सर्वात शक्तिशाली नौदलामध्ये भारतीय नौदलाची गणना होते. भारतीय नौदलाला नौदल दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!**

# वन्यजीव संरक्षण: मानवतेच्या अस्तित्वाचा मूलाधार

मानवी संस्कृतीचा इतिहास पाहिला तर मानवाने निसर्गासोबत सहजीवनाचे नाते निर्माण केले होते. प्राचीन काळात वन, नदी, पर्वत आणि वन्यजीव हे फक्त संसाधने नव्हते, तर सांस्कृतिक, धार्मिक आणि आध्यात्मिक जीवनाचा केंद्रबिंदू होते. मात्र, औद्योगिकीकरण, नागरीकरण, भौतिकवाद आणि विकासाच्या स्पर्धेने मानवाने निसर्गापासून स्वतःला वेगळे केले आणि परिणामस्वरूप पृथ्वीवरील जीवसृष्टी आज अभूतपूर्व संकटात आहे. ०४ डिसेंबर रोजी साजरा केला जाणारा 'वन्यजीव संरक्षण दिन' हा केवळ स्मरणाचा दिवस नाही, तर पर्यावरणीय संतुलनाच्या संरक्षणाचा आणि मानवी जबाबदारीची पुनर्स्थापना करण्याचा सामाजिक संदेश देणारा दिवस आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले तर वन्यजीव संरक्षण हा पर्यावरणीय न्याय, सामाजिक नीती, टिकाऊ विकास आणि सांस्कृतिक वारसा जपण्याचा व्यापक प्रश्न आहे.

न्यजीव हे केवळ जंगलातील प्राणी नसून पर्यावरणीय व्यवस्था आणि जीवनाच्या शृंखलेतील महत्त्वाचा दुवा आहेत. जैवविविधता ही निसर्गाची संपत्ती असून त्याचा नाश म्हणजे पृथ्वीवरील पर्यावरणीय संतुलनाचा नाश. समाजशास्त्रात 'इको-फेमिनिझम', 'एन्व्हायर्नमेंटल सोशिअलिझम' आणि 'ह्युमन-नेचर रिलेशन' सारख्या संकल्पनांद्वारे किंवा सिद्धांतांद्वारे मानव आणि निसर्गातील असमान सत्ता-संबंधांचा अभ्यास केला जातो. पर्यावरणवादी विचारवंतांच्या मते मानवाने स्वतःला निसर्गाचा स्वामी नव्हे तर त्याचा घटक मानले असते, तर आजची परिस्थिती वेगळी असती. आज जगभरात १० हजारांहून अधिक प्रजाती नामशेष होण्याच्या उंबरठ्यावर आहेत, आणि अनेक प्राणी केवळ इतिहासातील नोंदीत उरले आहेत. वाघ, गेंडा, चित्ता, हिमचित्ता, समुद्री कासव, गिधाडे, डॉल्फिन, तसेच हजारो पक्षी, कीटक आणि सरीसृपांच्या प्रजाती मानवी अतिक्रमणामुळे धोक्यात आहेत.

वन्यजीव संरक्षण हा केवळ पर्यावरणाचा मुद्दा नाही तर सामाजिक प्रश्न आहे. जंगलातील प्राण्यांचे अस्तित्व जंगलावर आणि जंगलाचे अस्तित्व स्थानिक आदिवासी आणि वनसमुदायांवर अवलंबून आहे. आदिवासी समाजाचा जीवनमार्ग हा वनसंस्कृतीशी एकरूप आहे. त्यांच्या लोककथा, नृत्य, पुराणकथा आणि श्रद्धांमध्ये वन्यजीवांचे स्थान अत्यंत पवित्र आहे. पण विकासाच्या नावाखाली जंगलतोड, खाणकाम, धरणे, रेल्वे प्रकल्प आणि नागरी विस्तारामुळे हे समुदाय विस्थापित होत आहेत, त्यांचे जंगलावरचे हक्क कमी होत आहेत आणि मानव-वन्यजीव संघर्ष वाढत आहे. चित्ता, बिबट्या किंवा हत्ती शेतात घुसतो तेव्हा तो दुष्ट प्राणी नसतो; तो त्याच्या नैसर्गिक अधिवासातून हुसकावला गेलेला जीव असतो. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले तर हा संघर्ष विकास मॉडेलच्या त्रुटींचे प्रतीक आहे, ज्यात निसर्गापेक्षा भौतिक प्रगतीला महत्त्व दिले गेले.

वन्यजीवांचे अस्तित्व पर्यावरणीय समतोल राखण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. उदा. गिधाडांचे प्रमाण घटल्यामुळे भारतात मृत प्राण्यांचे विघटन थांबले, ज्यामुळे संक्रमणांचे प्रमाण वाढले. वाघ, सिंह, बिबट्या यांसारख्या शिकारी प्राणी जीवसाखळीत संतुलन राखतात. मधमाश्या आणि पक्षी परागीकरण करून शेतीची उपज वाढवतात. डॉल्फिन, मगर आणि सागरी जीव हा जलस्रोत आणि सागरी परिसंस्थेच्या आरोग्याचे संकेतक आहेत. म्हणूनच समाजात 'मानवकेंद्रित विकास' ऐवजी 'परिसंस्थाकेंद्रित विकास' हा दृष्टिकोन स्वीकारणे गरजेचे आहे.

शिक्षण आणि जागरुकता ही संरक्षणातील महत्त्वाची पायाभूत साधने आहेत. आजची मुले मोबाईल गेम्स आणि आभासी जगात रममाण आहेत, पण जंगलातील पक्ष्यांचा आवाज किंवा नदीचा प्रवाह ऐकण्याची त्यांना संधी मिळत नाही. स्थानिक पर्यावरणावर आधारित शिक्षण, वन्यजीवांच्या क्षेत्रभेटी, आणि नैसर्गिक संसाधनांविषयी संवेदनशीलता निर्माण करणारे अभ्यासक्रम यामुळे पुढील पिढी पर्यावरणाबद्दल जागरूक होईल. सोशल मीडिया देखील माहितीचा प्रभावी दुवा आहे, पण त्याचवेळी 'भय', 'अंधश्रद्धा', 'विनाशकारी विचारसरणी' आणि फक्त मनोरंजन म्हणून वन्यजीव पाहण्याची मानसिकता बदलणे महत्त्वाचे आहे.

कायद्यांच्या दृष्टिकोनातून भारतात १९७२ चा वन्यजीव संरक्षण कायदा, राष्ट्रीय उद्याने, अभयारण्ये आणि प्रोजेक्ट टायगर, प्रोजेक्ट एलिफंट यांसारखे उपक्रम राबविण्यात येतात. परंतु कायदे पुरेसे नसतात, जर मानसिकता बदलली नाही तर. समाजशास्त्रीय दृष्टीने पाहता, संरक्षण ही सामूहिक जबाबदारी आहे. सरकार, स्वयंसेवी संस्था, स्थानिक समुदाय, संशोधक, पर्यावरणवादी, मीडिया आणि सामान्य नागरिक यांचे एकत्रित प्रयत्न आवश्यक आहेत. वन्यजीव केवळ 'जंगलातील वस्तू' नाहीत, ते पृथ्वीच्या परिसंस्थेचे सजीव नागरिक आहेत आणि त्यांना जगण्याचा अधिकार तितकाच आहे जितका मानवाला.

आज आपण अशा वळणावर उभे आहोत जिथे वन्यजीव संरक्षण हा निवडीचा प्रश्न राहिलेला नाही; तो अस्तित्वाचा प्रश्न आहे.

जंगल नसेल तर पाणी नाही, पाणी नसेल तर शेती नाही, आणि शेती नसेल तर मानवाचे जीवनच नाही. म्हणूनच ०४ डिसेंबर हा दिवस केवळ उपक्रम किंवा घोषणांचा दिवस नसून आत्मपरीक्षणाचा दिवस आहे. आपण भविष्याला काय देत आहोत, जीवसृष्टीने परिपूर्ण हिरवी पृथ्वी की निर्जीव वाळवंट?

शेवटी एवढेच वन्यजीवांचे संरक्षण म्हणजे जंगल वाचवणे आणि जंगल वाचवणे म्हणजे पृथ्वीला जिवंत ठेवणे. म्हणून आपल्या जीवनशैलीत बदल करा, निसर्गाशी नाते पुन्हा जोडून घ्या, आणि प्रत्येक जीवप्रकाराला त्याच्या अस्तित्वाचा अधिकार देणारा समाज निर्माण करा. कारण आपण विसरू नये की मानव पृथ्वीचा मालक नाही, तर फक्त तात्पुरता पाहुणा आहे, आणि वन्यजीव हे तिचे खरे वारसदार आहेत.

**-डॉ. राजेंद्र बगाटे**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

# पन्नगेश्वर शुगर मिल्सचा २०२५-२६ गळीत हंगाम अत्यंत साधेपणाने, पण उत्साहपूर्ण वातावरणात सुरु झाला.

**आत्ताच एक्सप्रेस**

**बीड/ प्रतिनिध/** रेणापूर, पानगाव (जि. लातूर) येथील कारखान्यात हा शुभारंभ रविवारी पार पडला. यावेळी कोणताही मोठा समारंभ न ठेवता, हंगामाचा प्रारंभ कारखान्याच्या परिसरात प्रतिकात्मक पद्धतीने करण्यात आला. राज्यात सुरू असलेल्या निवडणूक काळामुळे, सार्वजनिक कार्यक्रमाचे स्वरूप सोपे आणि शांत ठेवण्यावर भर देण्यात आला.शुभारंभाच्या कार्यक्रमात लोकनेते स्व. गोपीनाथरावजी मुंडे आणि



स्व. विमलताई मुंदडा यांच्या प्रतिमांना अभिवादन करून, त्यांच्या कार्याची आठवण ठेवण्यात आली. पन्नगेश्वर शुगर मिल्सचे अध्यक्ष अक्षय मुंदडा यांनी शेतकऱ्यांसाठी पहिला हप्ता प्रति टन २,७०० निश्चित केला असून, हंगामाच्या अखेरीस कारखान्याच्या आर्थिक स्थितीनुसार अंतिम हप्त्याचा निर्णय घेतला जाईल, अशी माहिती त्यांनी दिली.

हा कारखाना पूर्वी लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे यांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी सुरू केला होता, मात्र गेल्या तीन वर्षांपासून तो बंद अवस्थेत होता. यंदा जून महिन्यात छउडछ (राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण) प्रक्रियेनंतर अक्षय मुंदडा यांनी कारखान्याचा ताबा घेतला आणि व्यवस्थापनाची जबाबदारी स्वीकारली. ताबा मिळाल्यानंतर कारखान्यात मोठ्या प्रमाणात दुरुस्ती, तांत्रिक सुधारणा आणि उपकरणे बदलण्याचे काम सुरु झाले. विशेषतः जुना बॉयलर पूर्णपणे बदलून नवीन अत्याधुनिक बॉयलर बसवण्यात आला असून, यंदा गाळप पूर्ण क्षमतेने होणार असल्याचे व्यवस्थापनाने स्पष्ट केले.

यंदा हंगामासाठी कारखान्याने ३ लाख टन ऊस गाळपाचे महत्वाकांक्षी उद्दिष्ट ठेवले आहे. रेणापूर, परळी, अंबाजोगाई, चाकूर, केज आणि लातूर तालुक्यातील शेतकऱ्यांचा ऊस प्राधान्याने स्वीकार केला जाणार आहे. यामुळे स्थानिक शेतकऱ्यांना ऊस विक्रीसाठी योग्य आणि वेळेवर संधी उपलब्ध होणार आहे, तसेच आर्थिक दृष्ट्या त्यांना मोठा लाभ मिळेल.

अक्षय मुंदडा यांनी शेतकऱ्यांनी दाखवलेल्या विश्वासाबद्दल आभार मानले आणि म्हटले, पानगाव परिसरातील ऊस उत्पादकांचे हित जपणे हे स्व. गोपीनाथराव मुंडे यांचे स्वप्न पूर्ण करण्याचे आपले ध्येय आहे. त्यांनी विश्वास व्यक्त केला की, कारखान्यातील नव्या तंत्रज्ञानामुळे आणि दुरुस्तीमुळे यंदाचा हंगाम शेतकऱ्यांसाठी फायदेशीर आणि सकारात्मक ठरेल.

कारखान्याचे व्यवस्थापन यंदा अधिक पारदर्शक आणि शेतकऱ्यांवर लक्ष केंद्रीत करून काम करणार आहे. तसेच, कामाच्या गुणवत्तेसोबतच वेळेवर हप्त्याची वाटणी ही सुनिश्चित केली जाईल, जेणेकरून शेतकऱ्यांना आर्थिक स्थिरता मिळेल आणि स्थानिक अर्थव्यवस्थेवर सकारात्मक परिणाम होईल.

या गळीत हंगामाच्या यशस्वीतेसाठी कारखान्याच्या व्यवस्थापनाने सर्व तयारी पूर्ण केली असून, ऊस उत्पादकांना विश्वास असून यंदाचा हंगाम फलदायी ठरेल, असा अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

# कलाल-कलार समाजाला आर्थिक विकास महामंडळ केव्हा? सरकार आणखी किती अंत पहाणार?

गेल्या चार वर्षांपासून कलाल-कलार समाजाला न्याय मिळावा यासाठी महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटना सातत्याने प्रयत्न करीत आहे.परंतु सरकारला अजुनपर्यंत जाग आलेला दिसत नाही.समाजाला न्याय मिळावा यासाठी २०२२ मध्ये नागपूर विधानसभेवर मोर्चा काढण्यात आला होता, यानंतर २०२३ मध्ये पुन्हा नागपूर विधानसभेवर भव्य मोर्चा काढण्यात आला आणि आता ७ आक्टोंबर २०२५ ला मुंबई येथे आझाद मैदानावर मोठे आंदोलन करण्यात आले.याव्यतीरीक्त वेगवेगळ्या मंत्र्यांना व संबंधित मंत्रीमहोदयांना निवेदन देऊन समाजाच्या समस्यांबद्दल अवगत सुध्दा करण्यात आले.

या मोर्च्यादरम्यान व आंदोलनादरम्यान सरकारला समाजाच्या मागण्यांचा वेळोवेळी निवेदने व पाठपुरावा सुध्दा करण्यात आला.या व्यतीरिक्त मेल व्दारे व टपाद्वारे संपूर्ण पाठपुरावा करण्यात आलेला आहे. सोबतच संबंधित मंत्री, मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री यांना आतापर्यंत १०० ते १५० पाणांचा पाठपुरावा सुध्दा केलेला आहे आणि हा पाठपुरावा समाजाला न्याय देण्यासाठी सरकारसाठी भरपूर आहे असे मला वाटते. त्याचप्रमाणे अनेक वर्तमानपत्रांच्या माध्यमातून कलाल-कलार समाजाच्या समस्या महाराष्ट्र सरकारपुढे व राज्याच्या १४ कोटीं जनतेपर्यंत सुध्दा पोहचविण्यात आल्या. कारण सत्य परिस्थिती राज्याच्या जनतेपुढे मांडने हे समाजाचे कर्तव्य आहे असे मी समजतो. आर्थिक विकास महामंडळाच्या संदर्भात संबंधित खात्याचे मंत्री, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्याशी चर्चा सुध्दा झाल्यात प्रत्येक मंत्री महोदयांनी आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याचे आम्हाला ठोस आश्वासन सुध्दा दिले. परंतु आज चार वर्षांचा काळ लोटत आहे तरीही सरकारला समाजाच्या प्रती व समस्यांबद्दल प्रती अजुनपर्यंत जाग आल्याचे दिसत नाही हे स्वतंत्र भारताचे व लोकशाहीचे दुर्भाग्यच म्हणावे लागेल.राज्यात असेही अनेक समाज आहे की ज्या समाजाने कोणतेही आंदोलन केले नाही किंवा संघर्ष केला नाही अशाही समाजाला सरकारने आर्थिक विकास महामंडळ जाहीर केले व त्यांचे कार्य सुरू आहे याचेही कलाल-कलार समाज स्वागत करते.कारण कोणताही समाज असो तो विकासाच्या प्रवाहात यायलाच हवा.

महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटनेच्या अल्पशा मागण्या सरकार दरबारी आहेत आणि त्याबद्दल ठोस पाठपुरावे सुध्दा केले आहेत.याच अनुषंगाने समाजाला विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी व समाजाच्या युवकांना रोजगार मिळावा यासाठी भगवान सहस्त्रार्जुन आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यात यावे, विश्वकर्मा योजने अंतर्गत समाजाचा पारंपरिक मद्य व्यवसाय समाजाला देण्यात यावा इत्यादी समाज हिताच्या मागण्यांच्या संदर्भात सतत संघर्ष व पाठपुरावे सुरूच आहे.या पत्राद्वारे सरकारला पुन्हा विनंती करण्यात येते की,समाजाच्या प्रतीमहाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटनेचा पाठपुरावा संघर्ष, आंदोलन, वेळोवेळी दिलेले निवेदन, पत्रव्यवहार आणि समाजावर होत असलेला अन्याय या संपूर्ण बाबींचा सरकारने, संबंधित मंत्रीमहोदय, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांनी गांभीर्याने विचार करावा व इतर समाजाप्रमाणे कलाल-कलार समाजासाठी भगवान सहस्त्रार्जुन आर्थिक विकास महामंडळ स्थापन करून समाजाला योग्य न्याय मिळवून द्यावा अशी आग्रहाची विनंती समाजा मार्फत व संघटने मार्फत सरकारला व संबंधित मंत्रीमहोदयांना करण्यात येत आहे.

अन्यथा आम्हाला पुन्हा आंदोलनाचा मार्ग अवलंबावा लागेल. करिता सरकारला पुन्हा विनंती करण्यात येते समाजाचा अंत न पहाता सरकारने समाजाचे गांभीर्य लक्षात घेऊन समाजाच्या मागण्यांनवर नागपूर येथे होणाऱ्या हिवाळी अधिवेशन ताबडतोब ठोस निर्णय घ्यावा.जय हिंद.

**- रमेश लांजेवार,( राज्य प्रवक्ता )**

## महापरिनिर्वाण दिनानिमित्त आदिलाबाद-दादर विशेष गाडीची घोषणा

**जालना/ प्रतिनिध/**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त लाखो भाविक मुंबईतील दादर चौपाटी, चैत्यभूमी आणि इतर स्मारकांवर दर्शनासाठी येतात. या प्रचंड गर्दीचे योग्य नियोजन व्हावे, ग्रामीण व निमशहरी भागातील प्रवाशांना सोयीस्कर प्रवासाची सुविधा उपलब्ध व्हावी, तसेच नियमित गाड्यांवरील ताण कमी करण्यासाठी दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागाने आदिलाबाद-दादर विशेष गाडीची घोषणा केली आहे.ही विशेष गाडी आदिलाबाद, नांदेड, मराठवाडा आणि नाशिक प्रदेशातील प्रवाशांसाठी मोठी दिलासादायक ठरणार आहे. दोन्ही दिशांनी चालणाऱ्या या विशेष गाड्यांचे तपशील पुढीलप्रमाणे-गाडी क्रमांक ०७१२९-आदिलाबाद ते दादर ही गाडी ०५ डिसेंबर २०२५ सकाळी ०७:०० वाजता आदिलाबाद स्थानकातून सुटेल. नागेश्वर आणि बोरी आरेख्याजवळील ग्रामीण परिसरातून प्रवाशांची मोठी हालचाल लक्षात घेऊन या गाडीचे थांबे सुयोग्यप्रकारे नियोजित करण्यात आले आहेत.गाडी खालील प्रमुख स्थानकांवर थांबे घेणार आहे:किनवट, हिमायतनगर, भोकर, मुदखेड, नांदेड, पूर्णा, परभणी, मानवत रोड, सेलू, परतूर, जालना, छत्रपती संभाजीनगर, लासूर, रोटेगाव, नगरसोल, मनमाड, नासिक रोड, इगतपुरी, कल्याण मार्गे ही गाडी ०६ डिसेंबर रोजी सकाळी ०३:३० वाजता दादर येथे पोहोचेल.ही वेळ महापरिनिर्वाण दिनाच्या दर्शनासाठी सकाळच्या गर्दीपूर्वी मुंबईत पोहोचण्यास अत्यंत सोयीस्कर आहे. गाडी क्रमांक ०७१३० - दादर ते आदिलाबाद परतीची विशेष गाडी ०७ डिसेंबर २०२५ रात्री ०१:०५ वाजता दादर स्थानकातून सुटेल. ती कल्याण, इगतपुरी, नासिक रोड, मनमाड, नगरसोल, रोटेगाव, लासूर, छत्रपती संभाजीनगर, जालना, परतूर, सेलू, मानवत रोड, परभणी, पूर्णा, नांदेड, मुदखेड, भोकर, हिमायतनगर, किनवट मार्गे धावत सायंकाळी ०६:४५ वाजता आदिलाबाद येथे पोहोचणार आहे.ही वेळ प्रवाशांना मुंबईहून दर्शन आटोपून आरामात घरी परतण्याची उत्तम सुविधा देईल.

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील यश इन सभागृहात शिक्षण व उद्योग क्षेत्र समन्वय उपक्रम

**आत्तात एक्सप्रेस**

**नाशिक (प्रतिनिधी)** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील यश इन सभागृहात शिक्षण व उद्योग क्षेत्र समन्वय उपक्रम अंतर्गत नाशिक इंडस्ट्रीयल मॅन्युफॅक्चरर असोसिएशन (निमा) व लघु उद्योग भारती यांच्यासोबत विद्यापीठाची संयुक्त बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीचा मुख्य उद्देश शिक्षण क्षेत्रातील ज्ञान व कौशल्ये उद्योग क्षेत्राशी जोडून रोजगारक्षमतेत वाढ करणे आणि विद्यार्थ्यांना व्यावहारिक अनुभव देणे हा होता. बैठक अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे उपस्थित होते. व्यासपीठावर निमाचे अध्यक्ष श्री. आशिष नहार, विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, विद्यापीठ व्यवस्थापन मंडळ सदस्य प्रा. डॉ. डी. एम. गुजराथी, तसेच विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे संचालक प्रा. सुरेंद्र पाटोळे यांची प्रमुख उपस्थिती होती.अध्यक्षस्थानावरून प्रा. संजीव सोनवणे यांनी सांगितले की शिक्षण क्षेत्रातून उद्योग क्षेत्रात जात असलेले मनुष्यबळ काहीसे कच्च्या स्वरूपाचे असते, त्यामुळे त्याला उद्योग क्षेत्रातील वास्तविक कामकाजाशी सुसंगत बनवणे आवश्यक आहे. त्यांनी आत्मनिर्भर भारत व सन २०४७ पर्यंत विकसित भारत या दृष्टीकोनातून शिक्षण आणि उद्योग क्षेत्राचे सामंजस्य वाढविण्याचे महत्त्व अधोरेखित केले. प्रा. सोनवणे म्हणाले की विद्यापीठाचे पाठ्यक्रम आधारित शिक्षणक्रम आणि उद्योग क्षेत्रातील प्रत्यक्ष कामकाज यांची सांगड घालण्यासाठी विविध उपाययोजना करणे गरजेचे आहे. यामध्ये छोटे-छोटे कॅप्सुल शिक्षणक्रम, मार्गदर्शक हस्तपुस्तिका, लिंकसह प्रत्यक्ष कामकाजाचे व्हिडीओ, तसेच शैक्षणिक माहितीचे लघु व्हिडीओ तयार करणे यांचा समावेश आहे.



विद्यापीठाने उद्योग व्यवसायातील संशोधन आणि विकासासाठी एक-दोन वर्षे कालावधी असलेले अल्पकालीन प्रकल्प सुरू करण्यास तयार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच विद्यापीठाच्या रोजगाराभिमुख शिक्षणक्रमांची माहिती देत विद्यार्थ्यांना व्यावसायिक कौशल्ये विकसित करण्यासाठी अनेक उपक्रम सुरू असल्याचेही सांगितले. त्यांनी सर्व उपस्थितांना आवाहन केले की नाशिकसह देशाच्या विकासासाठी शिक्षण व उद्योग क्षेत्राने एकत्र येऊन काम करणे गरजेचे आहे.निमाचे अध्यक्ष श्री. आशिष नहार यांनी सांगितले की आधीच्या नकारात्मकतेला मागे टाकून सकारात्मक दृष्टिकोनातून काम करण्याची सुरुवात झाली आहे. त्यांनी नाशिकचा कुंभमेळा केवळ धार्मिकच नव्हे तर विकासाचा मेळाही ठरणार असल्याचे स्पष्ट केले. उद्योग क्षेत्राला प्रशिक्षित मनुष्यबळाची मोठी गरज असल्यामुळे शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांनी आणि उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधींनी एक समिती बनवून शिक्षण आणि प्रशिक्षणाद्वारे विकासाचा रोडमॅप तयार करावा, अशी सूचना त्यांनी मांडली.लघु उद्योग भारती, नाशिकचे संचालक श्री. निखील तापडिया यांनी मुक्त विद्यापीठ व निमाच्या उपक्रमात संपूर्णपणे सहभागी होण्याचे आश्वासन दिले. तसेच सिन्नर सहकारी औद्योगिक वसाहतीचे नामकरण आवारे यांनी उद्योग क्षेत्रातील उपलब्ध रोजगार व त्यासाठी आवश्यक कामगार यातील दरी कमी करण्यासाठी आजची बैठक महत्त्वाची असल्याचे सांगितले. यावेळी निमाचे संचालक संजय राठी, गोविंद बोरसे, नानासाहेब देवरे, मिलिंद राजपूत, प्रकाश गुंजाळ, लघु उद्योग भारतीचे संचालक योगेश जोशी, तसेच स्टार्टअप इंडिया, नाशिकचे मार्गदर्शक श्री. श्रीकांत पाटील यांनी आपले विचार मांडले आणि उपयुक्त सूचना दिल्या.बैठकीत 'संयुक्त चर्चा - सहकार्याच्या संधी' या विषयावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले. उद्योग क्षेत्राच्या गरजेनुसार शिक्षणक्रमाचा विकास, ऑन-जॉब ट्रेनिंग, आवश्यक सामंजस्य करार, कंपन्यांसाठी तत्काळ मनुष्यबळाची उपलब्धता, सल्लागार समितीची स्थापना आणि संयुक्त प्रकल्प यांसारख्या मुद्द्यांवर सविस्तर चर्चा झाली.

# ७ डिसेंबर २०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे भारतीय संविधानाच्या मूल्यांची जनजागृती जनजागरण परिषद



**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर /प्रतिनिधी**/७ डिसेंबर २०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे भारतीय संविधानाच्या मूल्यांची जनजागृती करण्यासाठी भव्य संविधान जनजागरण परिषद आयोजित करण्यात आली आहे.'आम्ही भारताचे लोक' यांच्या वतीने भारतीय संविधान दिन आणि संविधान अंमलबजावणी दिनाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त ही परिषद होणार असून, समाजातील सर्व घटकांना संविधानाचे महत्त्व, तत्त्वज्ञान आणि वर्तमानकाळातील त्याची उपयुक्तता समजावून देणे हा मुख्य उद्देश आहे.

परिषदेचे ठिकाण यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, मसाप, रॉक्सी सिनेमाजवळ, पैठण गेट, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथं दिनांक: ७ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी१२:३० वाजता होईल.या सभागृहात विद्यार्थ्यांपासून ते सामाजिक कार्यकर्त्यांपर्यंत विविध क्षेत्रातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे. संविधान विषयक चर्चांना योग्य तांत्रिक आणि सांस्कृतिक वातावरण मिळावे यासाठी हे स्थळ विशेष निवडण्यात आले आहे.

उद्घाटन व अध्यक्षस्थान या परिषदेचे उद्घाटन सर्वोच्च न्यायालयाचे ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. महमूद प्राचा (नवी दिल्ली) यांच्या हस्ते होणार आहे. कायदा, न्याय, मानवाधिकार आणि लोकशाही मूल्यांवरील त्यांच्या विचारांचा नागरिकांना मोठा लाभ होणार आहे.

परिषदेच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ माजी जिल्हा न्यायाधीश ॲड. प्रकाश परांजपे (छत्रपती संभाजीनगर) हे असणार आहेत. न्यायव्यवस्थेतील त्यांचा प्रदीर्घ अनुभव संविधानाच्या घटनात्मक मूल्यांवर अधिक सखोल चर्चा करेल.

मुख्य वक्ते या परिषदेत संविधानाच्या विविध पैलूंवर भाष्य करणारे नामवंत वक्ते उपस्थित राहणार आहेत:निरंजन टकले (नाशिक) ज्येष्ठ, निर्भीड आणि शोधपत्रकारितेसाठी प्रसिद्ध पत्रकार. देशातील लोकशाही, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि सामाजिक प्रश्नांवरील त्यांचे विचार लोकांना चिंतनास प्रवृत्त करतील.ॲड. स्मिता कांबळे (नागपूर उच्च न्यायालय खंडपीठाच्या विधिज्ञ) न्यायव्यवस्था, घटनादुरुस्ती, सामाजिक न्याय आणि संविधानिक अधिकारांवर त्या आपल्या अनुभवातून प्रकाश टाकतील.

परिषदेचे स्वागताध्यक्ष: इंजि. अशोक येरेकर, माजी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यक्रमाचे मुख्य संयोजक: संविधान विश्लेषक अनंत भवरे व प्रा. भारत सिरसाटया कार्यक्रमाच्या माध्यमातून संविधानाची लोकपर्यंत पोहोच वाढवणे, सामाजिक ऐक्य दृढ करणे, तसेच नागरिकांना आपल्या घटनात्मक जबाबदाऱ्यांची जाणीव करून देणे हे उद्दिष्ट आहे.

मान्यवर उपस्थिती या परिषदेला विविध क्षेत्रातील अधिकारी, विधिज्ञ, डॉक्टर, प्राध्यापक, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित राहणार आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने:ॲड. के.ई. हरिदास, न्या. डी.आर. शेळके, कॉ. किशोर ढमाले, ॲड. धनंजय बोरडे, डॉ. मच्छिंद्र गोर्डे, डॉ. ऋषीकेश कांबळे, साथी सुभाष लोमटे, डॉ. वासुदेव मुलाटे, कॉ. भीमराव बनसोड, प्रा. राम बाहेती, सुभाष महेर, प्रा. एच.एम. देसरडा, सुभेदार मेजर सुखदेव बन, ॲड. एस.आर. बोदडे, डॉ. शेख इक्बाल मिन्ने, ॲड. वैशाली डोळस, सतिश चकोर, डॉ. प्रमोद दुथडे, इंजि. चंदशेखर शिखरे, इंजि. महेश निनाळे, डॉ. एन.जी. नरवडे, ॲड. सुभाष सावंगीकर, बी.के. आदमाने, ॲड. डी.व्ही. खिल्लारे आणि अन्य मान्यवर.तसेच, कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी रतनकुमार साळवे, कॉ. अभय टाकसाळ, डॉ. जनार्दन पिंपळे, डॉ. फारूक खान, अतकरे बापू, सविता अभ्यंकर, अरविंद खैरनार यांच्यासह मोठ्या कार्यकर्त्यांची टीम परिश्रम घेत आहे.

संविधान ही भारताची सर्वोच्च किमान मर्यादा आणि प्रत्येक नागरिकासाठी मार्गदर्शक दीपस्तंभ आहे. त्यातील मूल्यांचे आकलन आणि पालन करणे ही सामूहिक जबाबदारी आहे.म्हणूनच,या संविधान जनजागरण परिषदेला सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक समितीने केले आहे.

# शेतकऱ्याच्या मुलाचा मोठा लौकिक - डॉ. कैलास आहेर वरिष्ठ भूवैज्ञानिक पदासाठी निवड



**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर /प्रतिनिधी/** छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वैजापूर तालुक्यातील डोंगरथडी भागातील पारळा येथील शेतकरी कुटुंबातील सुपुत्र डॉ. कैलास रामभाऊ आहेर यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (MPSC) घेण्यात आलेल्या महाराष्ट्र भूजल सेवा परीक्षा मध्ये त्यांची भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा (GSDA) अंतर्गत गट-अ वरिष्ठ भूवैज्ञानिक पदासाठी निवड झाली आहे.

**कठोर निवड प्रक्रियेत यश**

या स्पर्धा परीक्षेत तांत्रिक ज्ञान, भूवैज्ञानिक विश्लेषण क्षमता, तसेच प्रशासनिक कौशल्य अशा विविध निकषांवर उमेदवारांची कसोटी घेतली जाते. या पारदर्शक प्रक्रियेत डॉ. आहेर यांनी आपल्या कौशल्याच्या जोरावर यश मिळवले.

दहा वर्षांची प्रभावी कामगिरी

गेल्या दशकभरात त्यांनी भूजल क्षेत्रातील अनेक महत्त्वपूर्ण प्रकल्पांमध्ये मोलाचे योगदान दिले आहे. भूजल अंदाजपत्रक व मुल्यमापन जागतिक बँक सहाय्यित जलस्वराज्य-२ प्रकल्पातील प्रभाव अहवालमराठवाडा विभागाचा पाणी गुणवत्ता अहवाल या कामांचा विशेष उल्लेख केला जातो.भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त त्यांना 'उत्कृष्ट भूवैज्ञानिक अधिकारी' हा सन्मान मिळालेला आहे.

समाजकार्यातील सक्रिय सहभाग

ग्रामीण भागातील पाणी स्रोतांचा अभ्यास, विहिरींचे सर्वेक्षण, जलसंधारण, शाश्वत जलवापर योजनांबरोबरचमहिला बचत गट, शेतकरी, शहरी अपार्टमेंट, औद्योगिक क्षेत्र, महाविद्यालयीन युवक यांच्यात 'पुनर्भरण करूनच पाण्याची बचत'या संकल्पनेची जनजागृती त्यांनी 'जिओ फोरम'च्या माध्यमातून केली आहे.संशोधन क्षेत्रातील उल्लेखनीय नोंद आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांचे ६० संशोधन पेपर प्रकाशित झाले असून १० राष्ट्रीय संस्थांनी त्यांना फेलोशिप प्रदान केली आहे.

डॉ. आहेर यांच्या या यशाबद्दल खासदार संदीपान भुमरे, आमदार रमेश बोरनारे, आमदार बबनराव लोणीकर, प्राचार्य नामदेव आहेर, प्राचार्य अशोक तेजनकर, प्रा. लक्ष्मणराव धुमाळ, प्रा. प्रकाश कुलकर्णी, प्रा. प्रफुल शिंदे, प्रा. प्रमोद पाथ्रीकर, विशाल शेळके, गोरख आहेर, बापूसाहेब आहेर, इंजि. शिवाजी आहेर, सुनील बापू आर्दड, रवी हरबक, प्रशांत बोनगे, दौलत ढवळे, शाम शिंदे यांनी अभिनंदन केले आहे.

# जागतिक दिव्यांग दिनानिमित्त दिव्यांगांचा सत्का

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** जागतिक दिव्यांग दिनानिमित्त जिल्हा परिषद समाजकल्याण विभागामार्फत तापडीया नाट्यगृह निराला बाजार येथे दिव्यांग दिन साजरा करण्यात आला.




यावेळी विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केलेल्या दिव्यांगांचा तसेच दिव्यांग कल्याण क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्ति व संस्थांचा सत्कार करण्यात आला.

अध्यक्षस्थानी इतर मागास बहुजन कल्याण, दुग्ध विकास, अपारंपारिक उर्जा मंत्री अतुल सावे होते. तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित, समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त दीपक खरात, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी बाबासाहेब अरवत आदी मान्यवर उपस्थित होते.

दिव्यांग कल्याण विभागाचा परिचय, दिव्यांग कल्याणासाठी शासकीय योजना, विभागाचे धोरण, कायदे, नियम, दिव्यांग प्रतिबंधात्मक उपाय याबाबत यावेळी मार्गदर्शन करण्यात आले. दिव्यांग क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्ती व संस्था तसेच राज्यस्तरावर क्रीडा स्पर्धेत प्रथम पारितोषिक मिळविणारे खेळाडू यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी कार्यालयामार्फत करण्यात आले. त्यास जिल्ह्यातील दिव्यांगाच्या विशेष शाळा, कार्यशाळा येथील मुख्याध्यापक व कर्मचारी यांनी कार्यक्रमास सहकार्य केले. मुख्याध्यापक कैलास निकम यांनी सूत्रसंचालन केले तसेच श्रीमती यामिनी काळे यांनी आभार प्रदर्शन केले.

# डाक विभागातील गैरहजर कर्मचाऱ्यास आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** छत्रपती संभाजीनगर येथील पोस्टल असिस्टंट पदावरील कार्यरत कर्मचारी स्वप्निल महादेव तुपशेंद्रे हे दि.२४ मार्च २०२५पासून अनधिकृतरित्या गैरहजर आहेत. याबाबत त्यांना दि.२८ एप्रिल पंजी पत्र व इमेल द्वारे कळवून तात्काळ हजर होण्याच्या सुचना देण्यात आल्या मात्र ते हजर झाले नाहीत. सतत गैरहजर असल्यामुळे त्यांना नियम १४ अन्वये आरोपपत्र दि.१० सप्टेंबर रोजी देण्यात आले ते त्यांच्या घरच्या पत्त्यावर नोंदणीकृत डाकेने देण्यात आले मात्र दिलेल्या पत्त्यावर प्राप्तकर्ता रहात नाही अशी नोंद झाली. त्यासाठी शेवटचा पर्याय म्हणून जाहीर सुचना देऊन त्यांना कोणत्याही कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते सायं.६ यावेळात कार्यालयात हजर राहून आपले आरोपपत्र प्राप्त करावे,असे आवाहन सहायक निदेशक डाक सेवा, पोस्टमास्तर जनरल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी केले आहे.

# 'मागेल त्याला सौर कृषिपंप' योजनेत महाराष्ट्राने गाठला उच्चांक

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)**'मागेल त्याला सौर कृषिपंप' योजनेत महाराष्ट्राने विश्वविक्रम केला आहे. महावितरणने एकाच महिन्यात ४५,९११ सौर कृषिपंप लावण्याचा जागतिक उच्चांक गाठला आहे. या विक्रमाची गिनिज बुकमध्ये यशस्वी नोंद झाली आहे. मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत शुक्रवारी (५ डिसेंबर २०२५) रोजी सकाळी १० वाजता गिनीज बुकतर्फे विश्वविक्रम प्रमाणपत्र प्रदान सोहळा छत्रपती संभाजीनगरच्या शेंद्रा एमआयडीसीमध्ये ऑरिक सिटी मैदानावर होणार आहे.

कार्यक्रमास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री श्री.अजित पवार, अपारंपरिक ऊर्जामंत्री अतुल सावे, छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्रीसंजय शिरसाट, ऊर्जा राज्यमंत्री श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर, अपर मुख्य सचिव ऊर्जा श्रीमती आभा शुक्ला, महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

शेतकऱ्यांना केवळ दहा टक्के रक्कम भरून सौर पॅनल्स आणि कृषिपंप असा संपूर्ण संच देण्याच्या 'मागेल त्याला सौर कृषिपंप' या योजनेत महाराष्ट्राने आघाडी घेतली आहे. मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांनी 'मागेल त्याला सौर कृषिपंप' योजनेच्या अंमलबजावणीवर भर दिला आहे. संपूर्ण देशात महाराष्ट्राने सर्वाधिक सौर पंप बसविण्याचा उच्चांक गाठला आहे. राज्यात साडेदहा लाख सौर कृषिपंप बसविण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यामुळे कृषिपंपासाठी पैसे भरून वीज जोडणीची प्रतीक्षा करणाऱ्या सर्व शेतकऱ्यांचा 'पेड पेंडिंग'चा प्रश्न सुटणार आहे. 'मागेल त्याला सौर कृषिपंप' योजनेसाठी महावितरणने स्वतंत्र पोर्टलची निर्मिती केली आहे. शेतकऱ्यांनी पंपासाठी ऑनलाईन नोंदणी केल्यानंतर महावितरणकडून अर्ज मंजूर केला जातो. त्यानंतर शेतकऱ्याने त्याचा हिस्सा भरायचा असतो. शेतकऱ्याकडून पंप बसविण्यासाठी एजन्सीची निवड केली जाते. पंप बसविण्याच्या ठिकाणाची महावितरण, एजन्सी व शेतकरी अशी तिघांकडून संयुक्त पाहणी केली जाते, त्यानंतर कार्यादेश दिला जातो आणि शेतात पंप बसविला जातो. पंप बसविणाऱ्या एजन्सीवर पुढच्या काळात देखभाल दुरुस्तीचीही जबाबदारी आहे.

सौर पॅनल्समधून २५ वर्षे वीजनिर्मिती होत असल्याने तेवढा काळ शेतकऱ्यांना कृषिपंपाचे वीजबिल येत नाही. हे पंप पारंपरिक वीजपुरवठ्यावर अवलंबून नसल्याने शेतकऱ्यांना त्यांच्या मर्जीप्रमाणे दिवसा कधीही सिंचन करता येते. त्यामुळे दिवसा वीजपुरवठ्याची शेतकऱ्यांची मागणी पूर्ण होते.

# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका, ई-निविदा सुचना

**जा.क्र./मनपा/ई- निविदा / २०२५ / ४३९**
**छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका**
**दिनांक :- ०२.१२.२०२५**

| अ.क्र. | कामाचे नांव | निविदा भरण्याची अंतिम दिनांक |
|---|---|---|
| १. | सी.सी.टी.व्ही कॅमेरे व इतर अनुषंगिक साहित्य तसेच Webcasting with streaming व इतर अनुषंगिक । साहित्य भाडे तत्वावर पुरवठा करुन कार्यान्वीत करणे व त्या अनुषंगीक सर्व कामे करणे. | ०६.१२.२०२५ |
| २. | छत्रपती संभाजीनगर पाणी पुरवठा योजना - हर्सुल जलशुध्दीकरण केंद्राकरिता ब्लिचिंग पावडर ग्रेड I (Bleaching Powder) चा पुरवठा करणे. | ०८.१२.२०२५ |
| ३. | हर्सल जलशुध्दीकरण केंद्र येथे आवश्यक अनुषंगीक कामांसह ७.५ अ.श. क्षमतेचा सबमर्शिबल मडपंप पुरवठा करणे व बसविणे. | ०८.१२.२०२५ |
| ४. | शहरातील भडके श्वान पकडून आणण्यासाठी एजन्सी नियुक्त करणे. | ११.१२.२०२५ |

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांचे वतीने योग्यत्या वर्गातील ठेकेदारांकडून ई- निविदा मागविण्यात येत आहे. निविदेची विस्तृत माहिती संकेतस्थळावर www.mahatenders.gov.in येथे उपलब्ध आहे.

**स्वाक्षरीत/-**
**सिस्टीम मॅनेजर (ई-निविदा)**
**छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका**

# सौ.अश्विनी अनिलराव लाठकर पानसरे यांना प्रतिष्ठित महाराष्ट्र रत्न पुरस्कार २०२५ जाहीर

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** जिल्हा परिषद, माध्यमिक शिक्षण विभागाच्या शिक्षणाधिकारी सौ.अश्विनी अनिलराव लाठकर पानसरे यांना प्रतिष्ठित महाराष्ट्र रत्न पुरस्कार २०२५ जाहीर करण्यात आला आहे. हा पुरस्कार दरवर्षी क्राईम प्रिव्हेन्शन अँटीकरप्शन कमिटी आणि इंटरनॅशनल ह्यूमन राईट्स अँबॅसॅडर ऑर्गनायझेशनच्या वतीने राज्यातील विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय कार्यकर्त्यांना त्यांच्या कार्याची दखल घेण्यासाठी प्रदान केला जातो. लाठकर यांची निवड त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानामुळे करण्यात आली आहे.




सौ. लाठकर यांनी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात माध्यमिक शिक्षणाची गुणवत्ता उंचावण्यासाठी अनेक महत्त्वाचे उपक्रम राबवले आहेत. त्यामध्ये शिक्षक प्रशिक्षणाचे परिणामकारक नियोजन, समृद्धी सराव परीक्षा, शिक्षक साहित्य संमेलन, दशसूत्रीच्या अंमलबजावणीतील सुधारणा, मूल्यांकन पद्धतींचे नविन मार्ग, तसेच विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर लक्ष केंद्रित करणारे नवोन्मेषी प्रयोग यांचा समावेश आहे. शाळा भेटीदरम्यान केलेले प्रत्यक्ष निरीक्षण आणि तंत्रज्ञानाधारित उपक्रमांची अंमलबजावणी यामुळे शैक्षणिक कार्यक्षमता अधिक परिणामकारक झाली आहे. समितीने या सर्व उपक्रमांना विशेष मान्यता दिली आहे, आणि असे मत व्यक्त केले आहे की या प्रयत्नांमुळे जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षण अधिक दर्जेदार व सुसंगत झाले आहे.

प्रशासकीय व्यवस्थापनाच्या क्षेत्रातही लाठकर यांनी अत्यंत लक्षणीय कामगिरी बजावली आहे. कार्यालयीन कामकाजातील पारदर्शकता, शासकीय योजनांचे वेळेवर नियोजन, जिल्हास्तरावरील शैक्षणिक समन्वय, तसेच उत्तरदायी व शिस्तबद्ध प्रशासन हे त्यांच्या कार्याचे वैशिष्ट्य ठरले आहे. शिक्षक, मुख्याध्यापक व शैक्षणिक घटकांशी सातत्यपूर्ण संवाद राखून लाठकर यांनी शैक्षणिक प्रशासन अधिक सक्षम, गतिमान आणि विद्यार्थ्यांवर लक्ष केंद्रीत करणारे केले आहे.

समितीचे अध्यक्ष डॉ. अविनाश संकुंडे यांनी आपल्या अधिकृत निवेदनात सांगितले,सौ.अश्विनी लाठकर यांनी जिल्ह्यातील शिक्षण व्यवस्थेला स्थैर्य, नवचैतन्य आणि प्रगतीचा मार्ग दाखवला आहे. त्यांच्या कार्याचा सकारात्मक प्रभाव भविष्यात राज्यभरातील शैक्षणिक क्षेत्रावर दिसून येईल,अशी आमची खात्री आहे. हा पुरस्कार वितरण सोहळा बुधवार, ३ डिसेंबर २०२५, रोजी मेयर हॉल, जुहू तारा रोड, अंधेरी वेस्ट, मुंबई येथे संपन्न होणार आहे. या सोहळ्यात लाठकर यांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव करण्यात येईल. त्यांच्या कार्याबद्दल शिक्षक, विद्यार्थी, पालक आणि प्रशासन यांच्याकडून मोठ्या प्रमाणात शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

सौ. लाठकर यांनी प्रतिनिधींशी संवाद साधताना सांगितले,ही निवड ही फक्त माझ्या मेहनतीचे फलित नाही, तर जिल्ह्यातील सर्व कल्पक आणि मेहनती शिक्षक, पर्यवेक्षकीय यंत्रणा आणि माझ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनामुळे शक्य झाली आहे. त्यांच्या सततच्या विश्वास आणि समर्थनामुळे मला ऊर्जा मिळते. यासोबतच माझ्या टीमच्या सामूहिक प्रयत्नांचा हा पुरस्कार आहे. माझ्या वाटचालीत यापुढेही अशीच प्रगती आणि कार्यक्षमता राहील, असा आत्मविश्वास मला आहे.या यशामुळे जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षण क्षेत्र अधिक सशक्त, नवनिर्मितीशील आणि गुणवत्तापूर्ण बनण्याच्या दिशेने एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे.

# गंगापूर शहरातील वैजापूर गंगापूर मुख्य रस्त्याच्या डिवायडर मध्ये धोकादायक झाडे हटविण्याची मागणी



**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर /प्रतिनिधी**/शहरातील वैजापूर-गंगापूर मुख्य रस्त्यावर स्थित डिवायडरमधील झाडे आणि वाहतुकीसंबंधी समस्या नागरिकांसाठी मोठा धोका बनली आहे. या रस्त्यावरून दररोज हजारो वाहनांची वाहतूक होते, त्यामुळे झाडांच्या दाटीमुळे आणि फांद्यांच्या रस्त्यावर लोंबकळण्यामुळे अपघातांची शक्यता वाढली आहे. काही झाडे जास्त उंच असून त्यांच्या फांद्या रस्त्यावरून येणाऱ्या वाहनांवर पडत असल्याने मोठ्या वाहनांसह दोनपांगरे वाहनांनाही धोका निर्माण होतो. विशेषतः बाबळीच्या झाडांच्या फांद्यांमुळे रस्त्यावरील दृश्य अवरुद्ध होते आणि चालकांना वाहन नियंत्रणात ठेवणे अवघड जाते.शिवाय, डिवायडरवर उभारण्यात आलेले इस्टेट लाईटचे पोल नागरिकांना सुरक्षा उपलब्ध करून देण्याऐवजी केवळ शोभेची वस्तू बनले आहेत. अनेक पोलांवरील लाईट दीर्घकाळापासून बंद असल्याने रात्रीच्या वेळी रस्त्यावर दृश्यमर्यादा कमी होते, आणि उसाच्या हंगामात ट्रॅक्टरवर ऊस वाहतूक होत असताना अपघातांचा धोका आणखी वाढतो. अंधारात वाहनधारकांना इतर वाहनांचा अंदाज घेणे कठीण होते, त्यामुळे अपघात टाळणे कठीण होते.नागरिकांनी संबंधित विभागाकडे तात्काळ लक्ष देण्याची मागणी केली आहे. त्याअंतर्गत, डिवायडरमधील सर्व धोकादायक झाडे काढणे, फांद्या साफ करणे आणि झाडांची योग्य ती छाटणी करणे आवश्यक आहे. तसेच, रस्त्यावरील पोलवरचे लाईट तात्काळ दुरुस्त करून सुरू करणे गरजेचे आहे. यामुळे रात्रीच्या वेळेस वाहनधारकांना सुरक्षितता मिळेल आणि अपघातांची शक्यता कमी होईल. नागरिकांना भीती वाटते की, संबंधित विभागाने याकडे दुर्लक्ष केल्यास अपघात घडल्यावरच त्यांना जाग येईल.एकंदरीत, गंगापूर शहरातील मुख्य रस्ता सुरक्षित आणि वाहतुकीस सुलभ बनविण्यासाठी डिवायडरमधील झाडांची नियमित देखभाल, पोलवरील लाईटची कार्यक्षम स्थिती आणि मार्गदर्शक चिन्हांची योग्य रित्या ठेवण अत्यंत गरजेची आहे. नागरिकांनी जोरदारपणे मागणी केली आहे की, संबंधित विभाग या समस्यांकडे त्वरीत लक्ष देऊन तात्काळ उपाययोजना करावी, जेणेकरून अपघात टाळता येतील आणि रस्त्यावरून सुचारू वाहतूक सुनिश्चित करता येईल.

## संक्षिप्त

### गोसेवा आयोग पुरस्कारासाठी आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** महाराष्ट्र गोसेवा आयोगाने राज्यातील देशी गोवंशाचे संरक्षण, संवर्धन आणि कल्याण करण्याच्या उद्देशाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. राज्यातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या नोंदणीकृत गोशाळा आणि शुद्ध गोवंश प्रक्षेत्रांना 'श्रेष्ठ राजदूत' (ब्रँड ॲम्बेसेडर) म्हणून सन्मानित करण्याची योजना जाहीर करण्यात आली आहे. प्रत्येक जिल्ह्यात एकूण दोन संस्थेची या सन्मानासाठी निवड केली जाणार असून, त्यांना 'गोसेवा आयोग पुरस्कार' प्रदान केला जाणार आहे. तरी पात्र नोंदणीकृत गोशाळा, गोसदन आणि पांजरपोळ संस्थांनी सहभागी व्हावे, असे आवाहन महाराष्ट्र गोसेवा आयोगाने केले आहे.निवडीसाठी संस्थांनी गोवंश संवर्धन, गोमय (गोबर) आणि गोमूत्र आधारित उत्पादनांचे मूल्यवर्धन, गो-आधारित प्राकृतिक (सेंद्रिय) शेती, गोशाळा व्यवस्थापन, गो पर्यटन, गोसंवर्धन केंद्राचे व्यवस्थापन आणि सामाजिक सहभाग अशा दहा 'गो-धोरणांवर' प्रभावीपणे काम केलेले असणे आदि निकष लावण्यात आले आहेत. आयोगाच्या नियमावलीनुसार, केवळ उत्कृष्ट कार्य करणाऱ्या संस्थांनाच सन्मानित करून त्यांना 'आत्मनिर्भर गोशाळा' बनविण्यास प्रोत्साहन देण्यात येणार आहे. यासाठी जिल्हास्तरीय पडताळणी समिती अहवाल सादर करेल. सर्व पात्र नोंदणीकृत गोशाळा, गोसदन आणि पांजरपोळ संस्थांनी या महत्त्वाकांक्षी कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी आपल्या संबंधित जिल्हा पशुसंवर्धन कार्यालयाशी संपर्क साधावा. अर्ज करण्याची अंतिम तारीख १० डिसेंबर २०२५ आहे. अधिक माहितीसाठी महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्या. असे जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

### नगर परिषद सार्वत्रिक निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** जिल्ह्यातील भोकरदन नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक-२०२५ साठी सुधारित निवडणूक कार्यक्रम घोषित करण्यात आला आहे. कार्यक्रमानूसार प्रभाग क्र.१ अ व ९ ब साठी नामनिर्देशनपत्र मागे घेण्याचा दि.१० डिसेंबर २०२५ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत राहील. दि.११ डिसेंबर रोजी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्यात येईल. मतदान दि.२० डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ७.३० ते ५.३० यावेळेत घेण्यात येईल. नगर परिषद मंगल कार्यालयात मतमोजणीसह निकाल दि.२१ डिसेंबर रोजी जाहीर करण्यात येईल. आणि दि.२३ डिसेंबर २०२५ पुर्वी कलम २१ मधील तरतूदीनुसार महाराष्ट्र शासन राजपत्रात निकाल प्रसिध्द करण्यात येईल. अशी माहिती जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिली आहे.

### जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** जिल्ह्यात ४ डिसेंबर २०२५ रोजी दत्त जयंती, दि.६ डिसेंबर रोजी दरवर्षी मुस्लीम धर्मीय काळा दिवस पाळतात तर हिंदु संघटना विजयी दिवस साजरा करतात. तसेच या दिवशी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे महापरिनिर्वाण दिन आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता राखण्यासाठी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) (३) अन्वये जालना जिल्ह्याच्या संपूर्ण हद्दीत दि.१६ डिसेंबर २०२५ पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी करण्यात आली आहे, असे आदेश अपर जिल्हादंडाधिकारी शशिकांत हदगल यांनी जारी केले आहेत.संपूर्ण जालना जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश दि. ३ डिसेंबर रोजी सकाळी ६ वाजेपासून ते दि. १६ डिसेंबर २०२५ रोजीच्या २४ वाजेपर्यंत लागू राहील. या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत बाळगता येणार नाही. व्यक्तीचे प्रेते, आकृत्या व प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. जाहीरपणे घोषणा, गाणे म्हणणे, वाद्य वाजविणे यास प्रतिबंध राहील. तसेच कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास किंवा मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश अधिकारी-कर्मचाऱ्यांना तसेच उपविभागातील पोलिस अधिकारी यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूका, सभा, मोर्चा यांना लागू राहणार नाही, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

### जालना येथे अनिवासी उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** जालना जिल्ह्यातील अनुसुचित जाती प्रवर्गातील सुशिक्षित युवागटातील महिला-पुरूषासाठी निःशुल्क एक महिना कालावधीच्या अनिवासी उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन जालना येथे करण्यात आले आहे.या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये उद्योजकीय प्रेरणा, उद्योजकीय गुणसंपदा, विविध संधी मार्गदर्शन, उद्योगाची निवड, उद्योगाचे व्यवस्थापन, उद्योगाला आवश्यक विविध परवाने, शासकीय व निमशासकीय विविध कर्ज योजना, खेळत्या भांडवलाचे व्यवस्थापन, बाजारपेठ पाहणी, प्रकल्प अहवाल तयार करणे, बँकेची कर्ज प्रक्रिया, उद्योगांना भेटी, सिध्दी प्रेरणा प्रशिक्षण आदीबाबत सविस्तर मार्गदर्शन केले जाईल. तसेच प्रशिक्षण पश्चात उद्योग सुरू करण्यासाठी हॅन्ड होल्डिंग सपोर्ट महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्रामार्फत केला जाईल. सदरील प्रशिक्षणामध्ये सहभागी होण्यासाठी प्रशिक्षणार्थी हा फक्त अनुसूचित जाती प्रवर्गातील असणे आवश्यक आहे. प्रशिक्षणार्थीकडे जातीचे प्रमाणपत्र, जात पडताळणी प्रमाणपत्र, आधार कार्डची छायांकित प्रत असणे गरजेचे असून उमेदवार हा १८ ते ५० या वयोगटातील असावा. इच्छुकांनी सदरील कार्यक्रमांच्या अधिक माहिती व प्रवेश अर्जाकरिता जातीचे प्रमाणपत्र, आधार कार्डची झेराक्स, टी.सी व पासपोर्ट साईज फोटोसह इच्छुकांनी प्रवेश अर्ज व अधिक माहिती साठी दि.८ डिसेंबर २०२५ पुर्वी कार्यक्रम आयोजक एमसीईडीचे दिलीप शिलवंत मो.८०८७२८३०६५ किंवा मराठा पार्क बिल्डिंग, विशाल कॉर्नर, छत्रपती संभाजीनगर चौफुली, जालना. फोन नं. ०२४८२- २२०५९२ येथे संपर्क साधावा. असे प्रकल्प अधिकारी, एमसीईडी, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# अंबड तालुका खरीदी-विक्री संघाचे संचालक मंडळ बिनविरोध

## जालना जिल्ह्यात अंबड येथील प्रतिष्ठित खरेदी विक्री संघाचे सर्व संचालकांची निर्विरोध निवड; सहकार चळवळीत आनंदाचा माहोल

**आत्ताच एक्सप्रेस**

**अंबड/ प्रतिनिधी** /अंबड तालुका खरेदी-विक्री संघाचे संचालक मंडळ बिनविरोध निवडून आले असून सहकार क्षेत्रात आनंद आणि समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यातील ही सहकारी संस्था हे तालुकेतील शेतकरी, व्यापारी आणि इतर सदस्यांसाठी महत्त्वाची संस्था मानली जाते. संस्थेच्या आर्थिक व्यवहारिक क्षमता, सदस्य कल्याण आणि सहकार चळवळीच्या विकासासाठी ही निवड खूप महत्वाची ठरते.

माहितीनुसार, बिनविरोध निवड प्रक्रियेत आजच्या दिवशी नियमानुसार उमेदवारी अर्जाची छाननी पार पडली. कोणत्याही जागेसाठी विरोधी उमेदवार नसल्यामुळे सर्व १७ संचालक निर्विरोध निवडले गेले. निवडणूक निर्णय अधिकारी श्री. संजय भोईटे यांनी अधिकृत नमुना-९ (Rule 32) जाहीर करून ही निवड अधिकृत केली आहे.

निवडलेल्या संचालक मंडळात सर्वसाधारण मतदार संघाचे संचालक, व्यक्तीगत मतदार संघाचे संचालक, अनुसूचित जाती, महिला मतदार संघ आणि इतर मागासवर्गीय सदस्यांचा समावेश आहे.

यामध्ये नरवडे किशोर बंडेराव, हुलमुख सुधाकर परमेश्वर, शेळके विष्णू भगवान, विर पंढरीनाथ शेषराव, कनके संजय आप्पासाहेब, सपकाळ शेषराव धुराजी, भोजणे भगवान मनाजी, लांडे उद्धव जगन्नाथ, तनपुरे नुकुल बाबुराव, हुसे आनंत रामराव यांसह अनेक सदस्यांचा समावेश आहे.

संचालक मंडळात माजी मंत्री राजेश टोपे यांच्या गटाचे नाऊ सदस्य असून, बदनापूर येथील भारतीय जनता पक्षाचे आमदार नारायण कुचे व सतिश घाटगे यांच्या गटाचे सदस्य संघाचे व्हाइस चेअरमन आणि चेअरमन पद भरणार आहेत. यामुळे विविध राजकीय गटांचे संतुलन राखून सहकारी उपक्रमांच्या विकासासाठी एक मजबूत व सुसंगत मंडळ तयार झाले आहे.

संचालक मंडळाची निवड बिनविरोध झाल्याने संघातील सदस्य, शेतकरी, सहकारी कार्यकर्ते आणि तालुक्यातील सर्व हितसंबंधी व्यक्ती उत्साही झाले आहेत. हा निर्णय संघाच्या व्यवहारिक, आर्थिक आणि सहकारी विकासासाठी सकारात्मक ठरेल असा विश्वास व्यक्त केला जात आहे. पुढील कार्यकाळात संघाच्या विस्तारासाठी नवीन योजना, शेतकऱ्यांसाठी लाभ आणि सेवा सुधारणा, तसेच सहकारी क्षेत्रातील नव्या उपक्रमांना चालना मिळेल, असा अंदाज वर्तविला जात आहे.




या निवडीमुळे अंबड तालुका खरेदी-विक्री संघ एकात्मिक, प्रभावी आणि सर्वसमावेशक संघटनात्मक ढाच्यासह पुढे जाईल, जेणेकरून सदस्यांना अधिक सुविधा, आर्थिक स्थैर्य आणि सहकारी मूल्यांचा लाभ मिळेल. संघाच्या व्यवस्थापनात पारदर्शकता, कार्यक्षमतेसह सहभाग वाढविण्याची ही संधी असून, आगामी काळात स्थानिक शेतकरी आणि व्यापारी समुदायासाठी या संचालक मंडळाच्या पुढाकारातून मोठे योगदान अपेक्षित आहे.

# जागतिक एड्स दिनानिमित्त पी.एम.श्री जि.प. प्रशाला, जाफ्राबाद येथे मार्गदर्शन शिबिर संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**जाफ्राबाद / प्रतिनिधी/** पी.एम.श्री जि.प. प्रशाला, जाफ्राबाद येथे बुधवार, दिनांक ३ डिसेंबर २०२५ रोजी जागतिक एड्स दिन सप्ताह निमित्त विद्यार्थ्यांसाठी जनजागृती व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले.या शिबिरात विद्यार्थ्यांना एड्स म्हणजे काय, हा आजार कसा होतो, त्याची कारणे, प्रतिबंध, आवश्यक काळजी, आरोग्य संवर्धन तसेच एड्सविषयी समाजात निर्माण झालेले गैरसमज याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. एड्स प्रतिबंधाबाबत जागरूकता वाढावी यासाठी दरवर्षी १ डिसेंबर रोजी जागतिक एड्स दिन साजरा केला जातो, याबाबतही विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली.शिबिरात ग्रामीण रुग्णालय, जाफ्राबाद




येथील किशोरी समुपदेशक सागर दांडगे आणि प्राथमिक आरोग्य केंद्र, खासगाव येथील आरोग्य पर्यवेक्षक राजू खंडागळे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत एड्सची लक्षणे, निदानासाठी लागणारा कालावधी, प्रतिबंधात्मक उपाय आणि आरोग्य विषयक विविध पैलूंवर मार्गदर्शन केले. शाळेचे मुख्याध्यापक उमेश दुनगहू यांनी क्षयत संदर्भातील पोषक आहार, वैयक्तिक स्वच्छता आणि घ्यावयाची काळजी याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.यावेळी आरोग्य सेविका सौ. लता भिसे, सौ. तुळसा भोपळे यांनीही विद्यार्थ्यांना आवश्यक माहिती दिली. तसेच आरोग्य सेवक दमुता जंजाळ, विशाल कऱ्हाडे,परसराम जेऊघाले, शिक्षिका बाललक्ष्मी पेद्दी तसेच शिक्षक शिवहरी ढाकणे, शिवाजी देशमुख, अंकुश इंगळे, विजय वानरे, ओम देशमुख, संजय केवट, विष्णू मुनेमानिक, सुनिता नागरे, नंदाबाई चुंगडा हे उपस्थित होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक श्री. उमेश दुनगहू होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बळीराम उबरहंडे यांनी केले. शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जालना शहरातील रस्ते आणि चौक प्रायोगिक तत्वावर विकसीत करणार- जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** जालना शहरातील रस्ते आणि चौकांचा विकास प्रायोगिक तत्त्वावर करण्यात येणार आहे. या उपक्रमातून शहरात मोठा बदल घडवून आणण्याचे नियोजित आहे. महापालिका व सीएसआर फंडातून जालना शहरातील विविध चौक व रस्ते यांची विशिष्ट बांधणी करुन एक बदल घडवून आणणार तसेच या महत्त्वपूर्ण प्रकल्पामुळे शहरातील पायाभूत सुविधा सुधारण्यास आणि वाहतूक व्यवस्था अधिक सुरळीत होण्यास मदत मिळणार आहे. याअंतर्गत शहरातील विविध चौक आणि रस्ते यांची विशिष्ट बांधणी करून शहराचा चेहरामोहरा बदलला जाईल, अशी माहिती जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिली आहे.जिल्हाधिकारी कार्यालयात महापालिका, जालना फर्स्ट आणि विविध उद्योजकांच्या सीएसआर फंडातून प्रायोगिक तत्वावर जालना शहरातील चौक व रस्ते बांधणीसाठी बैठक घेण्यात आली. यावेळी महापालिका उपायुक्त विद्या गायकवाड, जालना फर्स्टचे प्रतिनिधी तसेच विविध उद्योजकांची उपस्थिती होती. यावेळी त्या बोलत होत्या.जिल्हाधिकारी आशिमा मित्तल म्हणाल्या, शहरातील छत्रपती संभाजीनगर चौफुली ते छत्रपती शिवाजी महाराज चौक ते मोतीबागेपासून परत छत्रपती संभाजीनगर चौफुली असा एकुण १० किलोमिटरचा रस्ता प्रायोगिक तत्वावार विकसित करण्यात येणार आहे. जालना शहराच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी महापालिका आणि कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (सीएसआर) फंडातून एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबविण्यात येणार आहे. महापालिका निधी आणि कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (सीएसआर) फंडातून शहरातील विविध चौक व रस्ते यांची विशिष्ट पद्धतीने आणि आधुनिक बांधणी केली जाईल.

# जालना शहरात लोकनेते कै. बलीराम यादव यांची २३ वी पुण्यतिथी भावपूर्ण वातावरणात साजरी

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** झोपडपट्टी विकास आणि समाजसेवा क्षेत्रातील मोलाची कामगिरी बजावणारे लोकनेते कै. बलीराम यादव यांची २३ वी पुण्यतिथी जालना शहरात श्रद्धा, आदर आणि भावनिक वातावरणात साजरी करण्यात आली.शहरातील विविध कार्यक्रमांत प्रशासकीय अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, शैक्षणिक संस्था आणि मोठ्या संख्येने नागरिकांनी सहभागी होऊन त्यांना विनम्र अभिवादन केले.




जालना महानगरपालिका कार्यालयात आयोजित विशेष श्रद्धांजली कार्यक्रमात बलीराम यादव यांना अधिकाऱ्यांसह नागरिकांनी पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहिली. या वेळी सहायक आयुक्त अर्पणा जाधव, अनुराधा नागोरी, केशव कानपुडे, कार्यालय अधीक्षक विजय फुलंब्रीकर, बंडू चव्हाण, रत्नपारखे, मोरे मॅडम, राहुल देशमुख, माजी नगरसेवक महेश निकम, महामाया न्यूजचे संपादक एस. प्रेमभाई जाधव, आदिवासी समाज विकास मंचाचे संस्थापक अध्यक्ष गोकुल अण्णा स्वामी, भाजप युवा शहर प्रमुख अमरदीप शिंदे आदी उपस्थित होते.

दधीमती चौकातील लोकनेता बलीराम यादव मार्गवरील पाटीसमोर नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांनी पुष्पहार अर्पित करून श्रद्धांजली वाहिली. कन्हैयानगर परिसरातील यादव अहिर संघ संचालित श्रीकृष्ण हिंदी विद्यालयात विद्यार्थी व शिक्षकांनी बलीराम यादव यांना अभिवादन केले आणि विद्यार्थ्यांना बिस्किटांचे वितरण करण्यात आले.

दलित नेते काशीनाथ साल्वे आणि श्रावण पवार यांनी बलीराम यादव यांच्या संघर्षमय जीवनाची, समाजसेवेची आणि गरीब वंचित वर्गासाठी केलेल्या कार्याची आठवण करून देत उपस्थितांना प्रेरित केले.शहरभर आयोजित श्रद्धांजली कार्यक्रमांतून लोकनेते बलीराम यादव यांचे समाजसेवी योगदान, कार्यतत्परता आणि मानवसेवेप्रती असलेले निष्ठापूर्ण समर्पण अधोरेखित झाले.

नागरिकांनी सांगितले की, बलीराम यादव यांचे कार्य आजही समाजासाठी प्रेरणादायी आहे.

या कार्यक्रमांत श्रीकृष्ण हिंदी विद्यालयाचे अध्यक्ष विनोद यादव, सचिव अभयकुमार यादव, दलित नेते काशीनाथ साल्वे, लक्ष्मण क्षीरसागर, श्रावण पवार, आर. पी. निकस, गोपाल खवले, वंश यादव, अंश यादव आणि सारांश यादव उपस्थित होते.

# दिव्यांग नागरिकांच्या समस्या प्राधान्याने सोडवाव्यात- जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** दिव्यांग नागरिकांच्या समस्या ओळखून त्या तातडीने आणि प्राधान्याने सोडविण्यास प्रशासन कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी सांगितले. विविध शासकीय योजनांमधून दिव्यांग बांधवांना दिला जाणारा लाभ कोणत्याही परिस्थितीत विलंब न होता पोहोचला पाहिजे, अशा सूचनाही त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

आज जिल्हाधिकारी कार्यालयात जागतिक दिव्यांग दिनाचे औचित्य साधून जालना जिल्ह्यातील दिव्यांग बांधवाच्या समस्या व अडचणी जाणून घेण्यासाठी आलेल्या शिष्टमंडळाशी चर्चा करतांना त्या बोलत होत्या. यावेळी अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, जिल्हा नियोजन अधिकारी सुचित कुलकर्णी, सामाजिक कार्यकर्ता समन्वय समिती मराठवाडा अध्यक्ष जगदीश येनगुपटला, दिव्यांग बांधव दिपक टेहरे, अर्जुन बुकन, अशोक जमदडे,मुन्ना दायमा, शेख अन्वर, अरबाज पठाण, संगिता कोरडे, संगिता लहाने यांची उपस्थिती होती. या बैठकीत दिव्यांग प्रमाणपत्र वितरण, सहाय्यक साधनांचे वाटप, शैक्षणिक व रोजगाराच्या संधी, अपंगत्व पेन्शन, संजय गांधीं निराधार योजना, अंत्योदय योजना, श्रावणबाळ योजना, दिव्यांग कायदा २०१६ ची प्रभावी अंमलबजावणी करणे,




प्रत्येक पोलीस स्टेशन मध्ये दिव्यांग नागरिकांच्या तक्रारी जाणून घेण्यासाठी विशेष फलक लावणे, तसेच पायाभूत सुविधा सुलभ करण्याबाबत सविस्तर चर्चा झाली. दिव्यांग नागरिकांना शासकीय दालनांमध्ये येताना कोणत्याही प्रकारची अडचण येऊ नये यासाठी आवश्यक त्या सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश त्यांनी दिले. दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक मदत, शिष्यवृत्ती, विशेष शिक्षण साधने यांची उपलब्धता वाढवण्याबरोबरच रोजगाराविषयी मार्गदर्शन शिबिरे घेण्याची गरज जिल्हाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

तसेच, प्रत्येक विभागाने दिव्यांगांच्या तक्रारी तात्काळ नोंदवून त्या वेळेत मार्गी लावाव्यात, असेही त्यांनी स्पष्ट केले.

दिव्यांगांच्या पुनर्वसनासाठी कार्यरत असलेल्या स्वयंसेवी संस्थांनीही प्रशासनासोबत समन्वय साधून काम करावे, असे आवाहनही जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले. दिव्यांगांच्या समस्या समजून घेत त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रशासन सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी आश्वासन दिले.

### महाविहार बावरीनगर दाभड येथे मार्गशीर्ष पौर्णिमेनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**

**नांदेड/अर्धापूर** / महाविहार बावरीनगर दाभड ता. अर्धापूर जि.नांदेड येथे आज ४ डिसेंबर २०२५ रोजी मार्गशीर्ष पौर्णिमेनिमित्त पू.भिक्खु प्रा.डॉ.एम. सत्यपाल महाथेरो यांच्या अध्यक्षते खाली विविध धम्म कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे.बौद्ध परंपरेत मार्गशीर्ष पौर्णिमेला अनेक ऐतिहासिक आणि धम्मपरिवर्तनकारी घटनांचे अद्वितीय महत्त्व लाभले आहे. याच पौर्णिमेच्या संदर्भात बौद्ध इतिहासात नोंदलेल्या काही ठळक घटना पुढीलप्रमाणे - (१) शाक्य कुलिय वादाचा शेवट : दोन शाक्य कुलांमध्ये निर्माण झालेला वाद तथागत भगवान बुद्धांनी करूणा, शांती आणि प्रज्ञेने मिटविला.या वादामुळे संभाव्य रक्तपात टळला आणि दोन्ही कुळांमध्ये पुन्हा सौदाह्य स्थापित झाले.(२) भिक्खुणी संघाची स्थापना : पूज्य भिक्खु आनंदाच्या मध्यस्थीने तथागत भगवान बुद्धांनी महिलांना संघात प्रवेश दिला आणि महिला संघाची (भिक्खुणी संघाची) स्थापना झाली-जी मानव इतिहासातील स्त्री-सक्षमी करणाची एक क्रांतिकारी घटना मानली जाते. (३) बोधिवृक्षाच्या फांदीचा श्रीलंकेत प्रेषण : राजा सम्राट अशोकाच्या कन्या संघमित्रा थेरीनें यांनी मार्गशीर्ष पौर्णिमेच्या दिवशी बोधिवृक्षाची पवित्र फांदी घेऊन श्रीलंकेतील अनुराधापूर येथे जाऊन तिची प्रतिष्ठापना केली. आजही अनुराधपूरचा महाबोधी हा वृक्ष जगातील सर्वात प्राचीन पूजनीय वृक्ष मानला जातो.उपासक - उपासिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून धम्म देसनेने लाभान्वित व्हावे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अॅण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813